महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

क्रमांक पुविमं/माध्य./क/218
पुणे–४११००५–
दिनांक–13/०१/२०२५.

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा/विद्यालय
जिल्हा–पुणे,अहमदनगर,सोलापूर

**विषय**–मार्च-२०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमधील तूट (Deficiency In Attendanxe) क्षमापित करणेबाबत ....

**संदर्भ**– जा.क्र.रा.मं./परीक्षा–८/४८६४ दि. ११/१२/२०२४.रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च-२०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा **दि.२१/०२/२०२५ ते दि.१७/०३/२०२५** या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेली आहे.

मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक ४१ मधील तरतुदीनुसार नियमित विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे ७५% टक्के असणे आवश्यक आहे. **प्रथम सत्रातील** हजेरी शैक्षणिक वर्षात **शाळा सुरू झाल्यापासून दिनांक १५/१०/२०२४ पर्यंत** व **द्वितीय सत्रातील** हजेरी ही **दिनांक १६/१०/२०२४ ते ०५/०२/२०२५** अखेर पर्यंतच विचारात घ्यावयाची आहे.

नियमानुसार ज्या विद्यार्थ्यांची दोनही सत्रातील हजेरी प्रत्येकी ७५% टक्क्यांपेक्षा कमी असल्यास असे प्रस्ताव सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये आवेदनपत्र रद्द असा स्पष्ट उल्लेख करून पाठविण्यात यावेत. सदर ७५% टक्क्यांपेक्षा कमी हजेरी असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नयेत. सदर प्रवेशपत्रे शाळेने त्वरित मंडळाकडे जमा करावीत.

ज्या विद्यार्थ्यांची दोनही सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे ६०% टक्केपेक्षा जास्त परंतु ७५% टक्केपेक्षा कमी असल्यास वैद्यकीय कारणास्तव अथवा विद्यार्थ्याच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थिती असे सबळ कारण असेल तरच प्रस्ताव आपल्या स्पष्ट शिफारशीसह हजेरी क्षामापित करण्याकरिता कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत. (योग्य त्या सर्व कागदपत्रांसहित)

CamScanner

सदर आवेदनपत्र रद्द दिनांक ०५/०२/२०२५ **नंतर** सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाला विद्यार्थ्याचे नैसर्गिक आपत्तीचे कारण वगळता इतर कारणांकरिता प्रति विद्यार्थी **दंडात्मक शुल्क** रू.१,०००/- शाळांना आकारण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

**अतिमहत्वाचे–** मंडळ नियमावलीतील नियम कमांक ४१ अन्वये आवेदनपत्र रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे त्वरित मंडळ कार्यालयाकडे सुपूर्त करण्यात यावीत. शाळेकडून अपात्र विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांना दिली जाणार नाहीत याची दक्षता शाळेने घ्यावी, असे अपात्र विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक यांची राहील.

सोबतच्या तक्त्यात नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांची माहिती भरून तक्ता व पत्र सादर करण्यात यावे.

**(औदुंबर उकिरडे)**
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–४११००५.

**प्रत माहितीसाठी तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे–४११००१.

२) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर

## * माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च-२०२५ *

केद्र क्र.:-..........................

हजेरी क्षमापित करण्याबातचा संकलित तक्ता (**NO CANDIDATE**)

**प्रथम सत्र:-** दि.१५ जून ते १५ ऑक्टोबर **द्वितीय सत्र:-** दि.१६ ऑक्टोबर ते ०५ फेब्रुवारी

| अ.क्र. | बैठक क्रमांक/ आवेदनपत्र | विद्यार्थ्याचे नाव | कामाचे दिवस | | उपस्थित दिवस | | उपस्थित (शेकडा) | | मुख्याध्यापकांची शिपासर (स्पष्ट उल्लेख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम सत्र हजर दिवस | द्वितीय सत्र हजर दिवस | प्रथम सत्र हजर दिवस | द्वितीय सत्र हजर दिवस | प्रथम सत्र | द्वितीय सत्र | |
| ०१ | | | | | | | | | |
| ०२ | | | | | | | | | |
| ०३ | | | | | | | | | |
| ०४ | | | | | | | | | |
| ०५ | | | | | | | | | |
| ०६ | | | | | | | | | |
| ०७ | | | | | | | | | |
| ०८ | | | | | | | | | |
| ०९ | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | |

**टिप** - मुख्याध्यापकांनी शिपासर करताना आवेदनपत्र रद्द करावे असा स्पष्ट उल्लेख करावा

स्थळ:-

दिनांक:-

मुख्याध्यापक

सही व शिक्का

CamScanner

# ✻ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च-२०२५ ✻

केद्र क्र.:-.........................

## आवेदनपत्र रद्द करण्याबाबत संकलित तक्ता

**प्रथम सत्र:-** दि.१५ जून ते १५ ऑक्टोबर **व्दितीय सत्र:-** दि.१६ ऑक्टोबर ते ०५ फेब्रुवारी

| अ.क्र. | बैठक क्रमांक/ आवेदनपत्र | विद्यार्थ्याचे नाव | कामाचे दिवस | | उपस्थित दिवस | | उपस्थित (शेकडा) | | मुख्याध्यापकांची शिपासर (स्पष्ट उल्लेख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम सत्र हजर दिवस | व्दितीय सत्र हजर दिवस | प्रथम सत्र हजर दिवस | व्दितीय सत्र हजर दिवस | प्रथम सत्र | व्दितीय सत्र | |
| ०१ | | | | | | | | | |
| ०२ | | | | | | | | | |
| ०३ | | | | | | | | | |
| ०४ | | | | | | | | | |
| ०५ | | | | | | | | | |
| ०६ | | | | | | | | | |
| ०७ | | | | | | | | | |
| ०८ | | | | | | | | | |
| ०९ | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | |

**टिप** - मुख्याध्यापकांनी शिपासर करताना हजेरी क्षमापित करावी असा स्पष्ट उल्लेख करावा

स्थळ:-
दिनांक:-

मुख्याध्यापक
सही व शिक्का

CamScanner